# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

१३ वा मजला, केंद्र. क्र.१, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४००००५
**दूरध्वनी :** ०२२-२२१६ ३९६४ /६५/६९ , **फॅक्स :** २२१६३९७६
**ई-मेल :** mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in
**संकेत-स्थळ :** www.mercindia.org.in/www.merc.gov.in


जाहीरात क्र०२/२०१९-२०

# जाहीर नोटीस

## कृषी पंपासाठी होणाऱ्या वीज वापराच्या विश्लेषणात्मक अभ्यासासाठी प्रस्तावित नमुना निवडण्याची पध्दत आणि सर्वेक्षण करण्याच्या पध्दतीवर अभिप्राय मागविण्याबाबत

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिनांक २ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या अधिसूचनेन्वये कृषी पंपासाठी होणाऱ्या वीज वापराच्या अभ्यासाकरिता अभ्यास गट गठीत केला आहे. दिनांक २ नोव्हेंबर, २०१८ रोजीची सदर अधिसूचना आयोगाच्या संकेत-स्थळावर उपलब्ध आहे. या अभ्यास गटाने, कृषी वीज वापराच्या अभ्यासासाठी नमुना निवडण्याच्या व सर्वेक्षण करण्याच्या पद्धतीबाबत प्रारुप तयार केले आहे.

उपरोक्त नमुना निवडण्याची आणि सर्वेक्षण करण्याची पध्दत आयोगाच्या www.merc.gov.in/ www.mercindia.org.in या संकेत-स्थळावर उपलब्ध आहे.

आयोग, प्रस्तावित नमुना निवडण्याचा आणि सर्वेक्षण करण्याच्या पध्दतीवर लेखी अभिप्राय आणि सूचना मागवित असून त्या सचिव, महाराष्ट्र नियामक आयोग, यांना १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४००००५ येथे व्यक्तिशः किंवा पोस्टाने किंवा फॅक्स क्र.०२२-२२१६३९७६ किंवा agstudy@merc.gov.in या ई-मेल द्वारा पाठवाव्यात.

**दि.२८ मे, २०१९** रोजी किंवा त्यापूर्वी प्राप्त झालेले सर्व अभिप्राय आणि सूचना नमुना निवडण्याच्या आणि सर्वेक्षण करण्याच्या पध्दतीस अंतिम स्वरुप देण्यापूर्वी अभ्यास गटाकडून विचारात घेण्यात येतील.

दिनांक : ०६ मे, २०१९
स्थळ : मुंबई

सचिव,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग